



दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २४०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, शुक्रवार, दि.११ एप्रिल २०२५




## डोनाल्ड ट्रम्प यांचा भारताला मोठा दिलासा !

### ९० दिवसांसाठी आयात कर स्थगित करण्याचा निर्णय...

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी चीन सोडून उर्वरित जगासाठी एक महत्त्वाची घोषणा केली आहे. चीन सोडून जगावरील आयात कराला ९० दिवसांची स्थगिती देण्याची घोषणा ट्रम्प यांनी केली आहे. भारतावरही लावण्यात आलेल्या आयात कराला ट्रम्प यांनी स्थगिती दिली आहे. भारताला मोठा दिलासा देणाऱ्या ट्रम्प यांनी चीनबाबतचे कठोर धोरण कायम ठेवले आहे.



चीनी मालावर १२५ टक्के कर लावण्याचा निर्णय ट्रम्प यांनी केला आहे. यापूर्वी ट्रम्प यांनी चीनवर १०४ टक्के कर लावला होता. आता त्यावर आणखी २१ टक्के कर वाढवला आहे.

जगातली ७५ देशांनी अमेरिकेशी संपर्क साधला होता. त्या देशांना दिलासा देण्याचा निर्णय ट्रम्प यांनी घेतला आहे. त्यामुळे आगामी ९० दिवस या देशांवर कोणताही आयात कर अमेरिका लादणार नाही. व्हाइट हाऊसने मंगळवारी चीनवर १०४ टक्के टॅरिफ लावला होता. या मोठ्या टॅरिफमुळे केवळ चीनच्या अर्थव्यवस्थेलाच झटका बसेल असं नाही तर दोन्ही देशांमध्ये एक नवं व्यापार युद्ध उद्भवण्याची शक्यता आहे.

चीनचे पंतप्रधान ली कियांग यांनी स्पष्ट केलं की,चीनजवळ पुरेसे धोरण पर्याय असून बाहेरील कोणताही आर्थिक झटका पूर्णपणे कुचकामी करू शकतो.ली कियांग यांनी ट्रम्प यांच्या टॅरिफ अटॅकच्या निर्णयाला एकतर्फी असल्याचं म्हटलं. तर यावर प्रत्युत्तर देण्याच्या तयारीचा जोर वाढला आहे.

## थोडक्यात

### हदगाव तालुक्यातील तामशात गुटखा तस्करी जोरात !



**अक्षराज : चंद्रकांत भोरे**

**दि.१०, हदगाव (नांदेड) :** हदगाव तालुक्यातील मोठी बाजारपेठ असलेल्या तामसा शहरात महाराष्ट्र शासनाने बंदी घातलेला सितार, गोवा, माणिकचंद, राज निवास, रजनीगंधा. ह्या गुटक्याची ठोक आणि किरकोळ विक्री राजरोसपणे तामसा शहरात आणि परिसरात चालू असून एवढेच नाही तर तामशाचे मेन गुटखा तस्कर आंध्रप्रदेशातून भोकर हिमायतनगर, मार्गे हे गुटखा गाड्यांच्या गाड्या भरून आयात करून आणून यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड महागाव, हिंगोली जिल्ह्यातील वसमत, कळमनुरी, बाळापुर, वारंगा अशा अनेक शहरात आणि गावात अनेक तालुक्यात बेधडक अनेक विविधचार चाकी गाडीत गुटखा भरून राजरोसपणे पाठवून ठोक विक्री करून तामसा येथील गुटखा तस्कर सर्वसामान्य जनतेच्या आणि शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्य आणि जीवितासी खेळ खेळत असून आणि निधड्या छातीने आम्ही पोलीस प्रशासन आणि अन्न औषध प्रशासन विभागाला अर्थपूर्ण संबंधातून शर्मिंदे करून कायदा खुर्चीला बांधून ठेवला असल्याची चर्चा तामसा येथील गुटखा तस्कर तस्करी करणाऱ्या गाडीवरील एका मजुरांनी नाव न छापण्याच्या आणि सांगण्याच्या अटीवर आमच्या प्रतिनिधी जवळ ही वरील सर्व माहिती सांगितली असून नांदेड परिक्षेत्राचे उपपोलीस महानिरीक्षक माननीय शहाजी उमाप, यांच्या अवैध धंदे विरोधी ध्येय धोरणानुसार जिल्ह्याचे कर्तव्यदक्ष नांदेडजिल्हा पोलीस अधीक्षक ह्यांनी मटका,जुगार नांदेड जिल्ह्य हदगाव तालुक्यातून हद्दपार करून सर्वसामान्य जनतेला दिलासा दिला असून तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी भोकर यांच्या मार्गदर्शनाखाली तामसा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक अन्न औषध प्रशासन विभागास हाताशी धरून तामसा शहरातील आणि परिसरातील राजरोसपणे किराणा दुकान पान शॉप पानपट्टी हॉटेल बाजूस होत असलेली गुटखा विक्री आणि तस्करीस तस्करी कायदेशीर पावबंद घालून तामशातील मेन तस्कराविरुद्ध गुन्हे दाखल करून बेकायदा अवैध गुटखा तस्करी आणि तामसा शहर आणि परिसरातील संपूर्ण गुटखा विक्री कायद्याने बंद करून मा. नांदेड परिक्षेत्राचे कर्तव्यदक्ष पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या ध्येयधोरणाची अंमलबजावणी करून सर्वसामान्य जनते बरोबरच शालेय विद्यार्थ्यांच्या आरोग्याला दिलासा देतीलअशी आशयाची मागणी हदगाव तालुक्याच्या तामसा शहर आणि परिसरातीलजनतेत जोर धरत आहे.

### एसटी कर्मचाऱ्यांसाठी आनंदाची बातमी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, मुंबई :** एसटी कर्मचाऱ्यांना गेल्या महिन्याचे फक्त ५६ टक्के वेतन मिळाले होते. त्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांमध्ये कमालीची नाराजी होती. मेहनत करुन ही हक्काचा पगार मिळाला नाही. त्यामुळे महिन्याचं बजेट पूर्ण कोलमडलं. कुणाचे बँकेच हाफ्ते चुकले, तर कुणाची आर्थिक कोंडी झाली. इतर सरकारी कर्मचाऱ्यांचे पगार वेळेत आणि पूर्ण होता. मग एसटी कर्मचाऱ्यांनी काय घोडं मारलं अशी प्रतिक्रीया उमटत होत्या. शेवटी सरकारने आता त्यावर तोडगा काढला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मध्यस्थीन तोडगा काढण्यात आला आहे. पूर्ण पगार न झाल्यामुळे एसटी कर्मचाऱ्यांनी याबाबत नाराजी व्यक्त केली होती. गुरूवारी सांगोला तालुक्याच्या दौऱ्यावर असताना उपमुख्यमंत्री शिंदे यांची काही एसटी कर्मचाऱ्यांनी भेट घेतली. त्यांनी पगार झाला नाही ही बाब एकनाथ शिंदे यांच्या कानावर घातली. आपले उर्वरित वेतन लवकरच द्यावे, अशी मागणी केली होती. या मागणीची तत्काळ दखल शिंदे यांनी घेतली. त्यानंतर त्यांनी राज्याचे वित्त सचिव ओमप्रकाश गुप्ता यांच्याशी फोनवरून चर्चा केली. या चर्चेअंती एसटी कर्मचाऱ्यांचे या महिन्याचे उर्वरित ४४ टक्के वेतन येत्या मंगळवारपर्यंत देण्यात येईल असे गुप्ता यांनी स्पष्ट केले. उपमुख्यमंत्री शिंदे यांच्या पुढाकाराने एसटी कर्मचाऱ्यांना दिलासा मिळाला आहे. कर्मचाऱ्यांवरिल वेतन कपातीचे संकट दूर होण्यास मदत झाली आहे. एसटी कर्मचाऱ्यांचा उर्वरित ४४ टक्के पगार येत्या मंगळवार पर्यंत देण्यात येणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी यासाठी पुढाकार घेऊन वित्त सचिवांशी केलेल्या चर्चेअंती एसटी कर्मचाऱ्यांचे प्रलंबित वेतन लवकरच अदा करण्याची त्यांनी तयारी दर्शवली आहे. राज्य परिवहन महामंडळ म्हणजेच एसटी महामंडळ तोट्यात असल्याचं सांगितलं जातं. त्यामुळे एसटीवर मोठ्या प्रमाणात आर्थिक ताण पडत आहे. खर्च जास्त आणि उत्पन्न कमी. त्यामुळे महामंडळाला राज्य सरकारच्या मदतीवर अवलंबून राहावं लागत आहे. राज्य सरकार कडून मदत आल्यानंतरच पुढील प्रक्रिया होतात. अनेक वेळा पगार उशिरा होतात. तर कधी होतच नाही अशी स्थिती निर्माण झालेली आहे. त्यात एसटीला फायद्यात आणण्याचे अनेक प्रयत्न झाले.पण त्यात तेवढे यश आले नाही.

## राज्य शासन दुष्काळग्रस्त भागाला पाणीदार करून सिंचन वाढवण्यासाठी कटिबद्ध - उपमुख्यमंत्री शिंदे

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१०, पंढरपूर :** राज्य शासन दुष्काळग्रस्त भाग पाणीदार करण्यासाठी विविध जलसंधारणाची कामे राबवत आहे. दुष्काळग्रस्त भागाला पाणी उपलब्ध करणे व सिंचन क्षमता वाढवणे यासाठी शासन कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

सांगोला येथे आयोजित भीमसैनिकांनी उभारलेल्या निधीतून डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे तसेच माजी आमदार शहाजी बापू पाटील यांच्या आमदार निधीतून साकारण्यात आलेल्या भव्य स्मारकाच्या अनावरण प्रसंगी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे मार्गदर्शन करत होते. यावेळी ग्रामविकास व पंचायत राज मंत्री तथा सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार गोरे, पर्यटन विकास मंत्री शंभूराज देसाई, खासदार धैर्यशील मोहिते पाटील, आमदार बाबासाहेब देशमुख, आमदार समाधान आवताडे, आमदार राजू खरे, माजी आमदार शहाजीबापू पाटील, माजी आमदार दीपक आबा साळुंखे यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री श्री. शिंदे पुढे म्हणाले शासनाने मंत्रिमंडळ बैठकीत म्हैसाळ उपसा सिंचन योजना व सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी ३ हजार कोटीच्या निधीला मान्यता दिलेली आहे. ताकारी व म्हैसाळ या दोन स्वतंत्र उपसा सिंचन योजना आहेत. सांगोला तालुक्याला देखील सिंचनासाठी पाणी उपलब्ध करण्यात येणार आहे. शासन दुष्काळग्रस्त भागाला पाणीदार करून त्या भागातील सिंचन क्षमता वाढवून शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

ह्या शासनाचे काम डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या आदर्श विचारावर चालत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला जे संविधान दिलेले आहे, त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना न्याय मिळत आहे. जिथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पाऊलखुणा आहेत तो भाग शासनाच्या वतीने विकसित करण्यात येत असून, त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यात येत आहे. आपल्या राज्याची आर्थिक परिस्थिती चांगली असून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना बंद होणार नाही असेही त्यांनी सांगितले. सांगोला तालुक्याचे विकासासाठी भरघोस निधी देण्यात आलेला असून पुढील काळातही सांगोला तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी निधी कमी पडू दिल्या जाणार नसल्याचे त्यांनी सांगून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकासाठी ५० लाखाचा निधी देत असल्याची घोषणा त्यांनी केली. तसेच सांगोला येथील एमआयडीसी जागा उपलब्ध करून देण्याच्या अनुषंगाने प्रयत्न करण्यात येतील असेही उपमुख्यमंत्री शिंदे यांनी यावेळी सांगितले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले की,




डॉ. बाबासाहेबांच्या या स्मारकातून आपण बाबासाहेबांचे विचार समता, स्वातंत्र्य व बंधुता हे सर्व घटकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करू. शासन समाजातील सर्व घटकांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील असून सांगोला तालुक्याचा ही विकास करण्यात येईल असे त्यांनी सांगितले. प्रारंभी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पालकमंत्री जयकुमार गोरे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई या मान्यवरांच्या हस्ते सांगोला येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर माजी आमदार शहाजी बापू पाटील यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा व त्यांचे भव्य स्मारक या अनुषंगाने प्रस्ताविक केले. या कार्यक्रमास हजारो भीमसैनिक उपस्थित होते.

**आरोग्य शिबिर...**

सांगोला येथे आयोजित आरोग्य शिबिराला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भेट देऊन ते पुढे म्हणाले की गेल्या अडीच वर्षात शासनाकडून मोठ्या प्रमाणात आरोग्य सेवेचे काम केले असून, मुख्यमंत्री सहायता निधीतून ४५० कोटी रुपये देण्यात आले. राज्यात हजारो रुग्णांचे प्राण वाचवण्याचे काम या मुख्यमंत्री सहायता निधीतून केले. काही आजारावरील उपचाराचा खर्च सामान्य कुटुंबांना परवडणारे नसतात. सामान्य कुटुंबातील नागरिकांना मोठ्या आजारावरती तात्काळ उपचार मिळावेत यासाठी महात्मा फुले जन आरोग्य योजनेची मर्यादा दीड लाख रुपयांपर्यंत होती त्याची शासनाने मर्यादा वाढवून पाच लाख रुपये पर्यंत केली आहे. तसेच त्यामधील अटी शर्ती देखील कमी करण्यात आल्या आहेत. राज्यातील साडेबारा कोटी जनतेला यातून आरोग्यसेवा उपलब्ध होणार आहे.

सद्यस्थितीत उन्हाळ्याचे दिवस सुरू असल्याने उष्णतेची लाट मोठ्या प्रमाणात जाणवत आहे. यासाठी नागरिकांनी आवश्यक ती काळजी घ्यावी असे आवाहन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.

## रोड मॉडेल व्हिलेजसाठी बाभुळवाडे गावात राज्यातली पहिली ग्रामसभा : शरद पवळे

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१०, सुपा (अहिल्यानगर) :** पारनेर तालुक्यातील बाबुळवाडे गावात शेतरस्त्यांचा प्रश्न अत्यंत गंभीर झाल्यामुळे शेतमाल बाजारात पोहोचवणे अवघड झाले. त्याचबरोबर शेत जमिनी पडीक पडायला लागल्या. शेतकऱ्यांमध्ये मोठ्या प्रमाणात वाद विकोपाला जावु लागले. त्याचबरोबर ग्रामपंचायत तहसील कार्यालयामध्ये शेतकऱ्यांचे अर्ज दाखल झाल्यामुळे शेतरस्त्यांच्या संघार्षाला पूर्णविराम देण्यासाठी बाभुळवाडे ग्रामस्थांनी शरद पवळे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा आयोजित केली. यावेळी रस्त्यांच्या समस्यांवर मान्यवरांनी मनोगते व्यक्त केली.

तदनंतर पवळे गावकऱ्यांनी दुरदृष्टी ठेवून गावाच हित समोर ठेवून वेळीच शेतरस्त्यांच्या बाबतीत जागरूकता निर्माण केल्यामुळे भविष्यात अनर्थ टळेल व गावात शेतकऱ्यांयमध्ये एकजुट राहील त्याचबरोबर पुढच्या पिढीच्या वाट्याला अशा समस्या राहणार नाही याची जबाबदारी आपण स्वीकारून गावाच्या उज्वल

> २१,२२ एप्रिल रोजी आझाद मैदान मुंबई येथे महाराष्ट्र शिवपानंद शेतरस्ता चळवळीचे प्रणेते शरद पवळे व राज्य समन्वयक दादासाहेब जंगले यांच्या नेतृत्वाखाली राज्यभरातील शेतकऱ्यांचे शेतरस्त्यांच्या मागण्यांसाठी होणाऱ्या आंदोलनाला बाभुळवाडे गावचा जाहीर पाठींबा त्याचबरोबर बाभुळवाडे गावाला रोड मॉडेल व्हिलेज करून राज्यात आदर्श उभा करण्यासाठी शिव पानंद शेतरस्ता चळवळीच्या पाठीशी खंबिरपणे उभे राहू
>
> **- बाळासाहेब नवले( उपरपंच बाभुळवाडे)**

भविष्यासाठी आपण गावतील सर्व शेतरस्त्यांच्या नकाशाप्रमाणे हद्द निश्चित करू,गावतील प्रश्न गावात सोडवु, वहिवाटीच्या रस्त्यांना गाव नकाशावर घेवु, गावात जेष्ठ अनुभवी नामरीकांच्या माध्यमातून ग्राम शेतरस्ता समिती बनवू सर्व रस्ते सामंज्यास्यातून खुले करून दर्जेदार रस्त्यांसाठी पाठपुरावा करू व गावाला लोकसहभाग श्रमदानातून रोड मॉडेल व्हिलेज बनवून राज्याला दिशादर्शक गाव बनवु. यावेळी जेष्ठ मार्गदर्शक गुलाबराव नवले यांनी लोकसहभागातून स्वयंस्पुर्तीने शेतरस्ते खुले करणारांना लोकसहभागातून मोफत जेसीबी उपलब्ध करून देण्याचे जाहीर केले.

कार्यक्रमादरम्यान शिवाजी जगदाळे, प्रमोद खणकर, दिलीप बोरुडे आदींनी मनोगत व्यक्त करताना समस्या मांडल्या. यावेळी सोन्याबापु पोटे डॉ.सुरेश खणकर, बाजीराव जगदाळे, जयराम जगदाळे, सविता जगदाळे, शोभा कोरडे, लक्ष्मी बोरुडे, दत्ता क्षीरसागर, भाऊ खोडदे, सावळेराम जगदाळे, गंगाराम पटाडे, मारुती जगदाळे, दादाभाऊ जगदाळे, भाऊ बोरुडे, अनिल जगदाळे, दशरथ जगदाळे, शांताराम बोरुडे, सावकार नवले यांसह अनेक शेतरस्ता पिडीत शेतकरी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी कार्यक्रमात शरद पवळे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपसरपंच बाळासाहेब नवले यांनी केले.

# संपादकीय



## शेतकऱ्यांचे कैवारी...

महात्मा जोतिराव गोविंदराव फुले यांचा जन्म दि.११ एप्रिल १८२७ रोजी झाला. हे एक भारतीय समाजसुधारक, समाजप्रबोधक, विचारवंत, समाजसेवक, लेखक, तत्त्वज्ञ आणि क्रांतिकारी कार्यकर्ते होते. त्यांना महात्मा फुले आणि जोतिबा फुले म्हणूनही ओळखले जाते. त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका होत्या. सप्टेंबर १८७३मध्ये त्यांनी महाराष्ट्रात सत्यशोधक समाज नावाची संघटना स्थापन केली. त्यांनी स्त्रियांच्या आणि मागासलेल्या आणि अस्पृश्यांच्या उन्नतीसाठी अनेक कामे केली. समाजातील सर्व घटकांना शिक्षण देण्याचे ते खंबीर पुरस्कर्ते होते. ते भारतीय समाजात जात-आधारित विभाजन आणि भेदभावाच्या विरोधात होते.

स्त्रियांना शिक्षणाचा हक्क मिळवून देणे, बालविवाहाला विरोध करणे, विधवा विवाहाला पाठिंबा देणे हे त्यांचे मूळ उद्दिष्ट होते. म.फुले यांना समाजाला कुप्रथा, अंधश्रद्धेच्या पाशातून मुक्त करायचे होते. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य महिलांना शिक्षण देण्यात, महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देण्यात घालवले. १९व्या शतकात महिलांना शिक्षण दिले जात नव्हते. फुले यांना स्त्री-पुरुष भेदभावापासून वाचवायचे होते. त्यांनी पुण्यात मुलींसाठी भारतातील पहिली शाळा बांधली. त्यावेळच्या स्त्रियांच्या दयनीय अवस्थेमुळे फुले खूप व्यथित आणि दु:खी झाले होते, म्हणूनच त्यांनी समाजात क्रांतिकारी बदल घडवून आणण्याचा दृढ निश्चय केला. त्यांनी स्वतः त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले यांना शिक्षण दिले. सावित्रीबाई फुले या भारतातील पहिल्या महिला शिक्षिका ठरल्या.

**सुरुवातीचे जीवन :** महात्मा ज्योतिबा फुले एका वर्षांचे असताना त्यांच्या आईचे निधन झाले. त्यांचे कुटुंब अनेक पिढ्यांपूर्वी साताऱ्याहून पुण्यात आले आणि फुलांचे गजरे बनवू लागले. त्यामुळे माळीच्या कामात गुंतलेली ही माणसे 'फुले' म्हणून ओळखली जायची. ज्योतिबांनी काही काळापूर्वीपर्यंत मराठीतून शिक्षण घेतले, ते सोडून दिले आणि नंतर वयाच्या २१व्या वर्षी इंग्रजीमध्ये सातवीचे शिक्षण पूर्ण केले. सन १८४०मध्ये त्यांचा विवाह सावित्रीबाई यांच्याशी झाला, त्यानंतर त्या स्वत: प्रसिद्ध समाजसेविका झाल्या. पती-पत्नी दोघांनीही दलित आणि स्त्री शिक्षण क्षेत्रात एकत्र काम केले. ते एक कष्टकरी आणि सामाजिक कार्यकर्ता होते.


**कार्यक्षेत्र :** त्यांनी विधवा आणि महिलांच्या कल्याणासाठी खूप काम केले, त्यासोबतच त्यांनी शेतकऱ्यांची स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांच्या कल्याणासाठीही खूप प्रयत्न केले. ज्योतिबांना संतांची चरित्रे वाचण्याची खूप आवड होती. जेव्हा देवासमोर सर्व स्त्री-पुरुष समान असतात, तेव्हा उच्च-नीच असा भेद का असावा, हे त्यांना कळून चुकले होते. स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी आणि त्यांच्या शिक्षणासाठी फुले यांनी सन १८४८मध्ये शाळा उघडली. या कामासाठी देशातील पहिली शाळा होती. मुलींना शिकवण्यासाठी त्यांना शिक्षक मिळाला नाही, म्हणून त्यांनी स्वतः काही दिवस हे काम करून पत्नी सावित्री फुले यांना पात्र बनवले. काही लोकांनी सुरुवातीपासूनच त्यांच्या कामात अडथळे आणण्याचा प्रयत्न केला, पण फुले पुढे सरकत असताना त्यांनी वडिलांवर दबाव आणून पती-पत्नीला घराबाहेर काढले, यामुळे त्यांचे काम काही काळ थांबले, पण लवकरच त्यांनी मुलींसाठी एकामागून एक तीन शाळा उघडल्या. **महात्मा पदवी :** गरीब आणि दुर्बलांना न्याय मिळवून देण्यासाठी ज्योतिबांनी सन १८७३मध्ये सत्यशोधक समाजाची स्थापना केली. त्यांची समाजसेवा पाहून सन १८८८मध्ये मुंबईत एका विशाल सभेत त्यांना महात्मा ही पदवी देण्यात आली. ज्योतिबांनी ब्राह्मण-पुरोहिताविना विवाह विधी सुरू केला आणि त्याला मुंबई उच्च न्यायालयानेही मान्यता दिली. ते बालविवाहाच्या विरोधात होते आणि विधवा पुनर्विवाहाचे समर्थक होते. आपल्या हयातीत त्यांनी गुलामगिरी, तृतीय रत्न, छत्रपती शिवाजी, राजा भोसलेंचा पवाडा, शेतकऱ्यांचा आसूड, अस्पृश्यांचा टाहो अशी अनेक पुस्तकेही लिहिली. महात्मा ज्योतिबा आणि त्यांच्या संघटनेच्या संघर्षामुळे सरकारने कृषी कायदा मंजूर केला. धर्म, समाज आणि परंपरा यांचे सत्य समोर आणण्यासाठी त्यांनी अनेक पुस्तकेही लिहिली. सन १८८३मध्ये स्त्रियांना शिक्षण देण्याच्या महान कार्यासाठी, त्यांना तत्कालीन ब्रिटिश भारतीय सरकारने स्त्री शिक्षणाचे जनक म्हणून गौरवले. दि.२८ नोव्हेंबर १८९० रोजी वयाच्या ६३व्या वर्षी पुणे येथे त्यांचे दु:खद निधन झाले.

# क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले

भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक, लेखक महात्मा जोतीराव फुले यांची जयंती. महात्मा जोतीराव फुले यांचा जन्म ११ एप्रिल १८२७ रोजी झाला. जोतीरावांच्या वडिलांचे नाव गोविंदराव तर आईचे नाव चिमणाबाई असे होते. सातारा जिल्ह्यातील कटगुण हे त्यांचे मूळ गाव. त्यांचे आडनाव गोऱ्हे असे होते पण त्यांच्या वडिलांचा फुले विक्रीचा व्यवसाय होता त्यामुळे ते फुले म्हणूनच ते ओळखले जाऊ लागले पुढे फुले हेच आडनाव रूढ झाले. काही दिवसांनी कटगुणहुन त्यांचे कुटुंबीय पुरंदर तालुक्यातील खानवडी येथे आले. खानवडी येथे त्यांचे घर असून त्यांच्या नावे सात बाराचा उतारा देखील आहे. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. जोतीराव फुले यांना लहानपणापासून शिक्षणाची आवड होती. १८४२ साली त्यांनी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये माध्यमिक शिक्षण घेण्यासाठी प्रवेश घेतला. अतिशय तल्लख बुद्धीच्या जोतिरावांनी पाच सहा वर्षातच तो अभ्यासक्रम पूर्ण केला. २३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. तथाकथित सनातनी उच्चवर्णीय लोकांकडून सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचार दूर करणे तसेच गुलामगिरीतून शूद्रातिशूद्र समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.

**'सर्वसाक्षी जगत्पती।**
**त्याला नकोच मध्यस्ती।।'**

हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठवला आणि समाज न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. या समाजातर्फे पुरोहितांशीवाय लग्न लावण्यास सुरुवात केली. मराठीत मंगलाष्टके रचली. समाजातील तळागाळातील लोकांपर्यंत शिक्षण पोहचवणे हे सत्यशोधक समाजाचे महत्वाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की




**विद्येविना मती गेली ।**
**मतिविना नीती गेली।**
**नितीविना गती गेली ।**
**गतिविना वित्त गेले ।**
**वित्ताविना शूद्र खचले ।**
**इतके अनर्थ एका अविद्येने केले ।।**

एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित करायचा असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्तमेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे असे त्यांचे मत होणे म्हणूनच त्यांनी त्याची सुरवात स्वतःच्या घरापासून केली. जोतिरावांनी त्यांच्या पत्नी सावित्रीबाईंना शिक्षण देऊन शिक्षण कार्यास प्रवृत्त केले. महात्मा फुले यांनी १८४८ साली पुण्यातील भिडे वाड्यात मुलींची पहिली शाळा काढून तेथील शिक्षिकेची जबाबदारी सावित्रीबाईंवर सोपवली. पुढे सावित्रीबाई या शाळेच्या मुख्याध्यापिकापदी आरूढ झाल्या.शाळेच्या मुख्याध्यापकपदी आरूढ झालेली भारतातील पहिली महिला म्हणजे सावित्रीबाई फुले त्याचप्रमाणे मुलींसाठी पहिली शाळा काढणारे पहिले भारतीय म्हणजे महात्मा जोतीराव फुले. महात्मा जोतीराव फुलेंनी देशात मुलींच्या शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली. आज सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत असे कोणतेच क्षेत्र नाही की ज्यात महिलांनी आपला झेंडा रोवला नाही. कला, क्रीडा, साहित्य, विज्ञान, तंत्रदान, शिक्षण, समाजकारण, राजकारण, अर्थकारण अशा सर्वच क्षेत्रात महिला आघाडीवर आहेत त्या केवळ आणि केवळ फुले दाम्पत्यांमुळे. महिलांसाठी फुले दाम्पत्यांनी जे कार्य केले ते ३३ कोटी देवांनीही केले नाही. महात्मा फुले यांनी पुण्यातील वेताळ पेठेत १८५२ साली अस्पृश्यांसाठी शाळा स्थापन केली. त्यांच्या या शैक्षणिक कार्याला सनातन्यांनी खूप विरोध केला. मुलींनी शिक्षणासाठी घराबाहेर पडणे म्हणजे धर्म बुडणे अशी आरोळी ठोकत सनातनी लोकांनी महात्मा फुले यांच्या या महान कार्यास विरोध केला. त्यांना मारण्यासाठी मारेकरी पाठवले पण महात्मा फुले डगमगले नाहीत. ते आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. महात्मा जोतीराव फुले यांना वाचनाची खूप आवड होती. विवीध महापुरुषांचे जीवनचरित्र वाचणे व त्यातून प्रेरणा घेणे हा त्यांचा आवडीचा छंद. छत्रपती शिवाजी महाराजांचे चरित्र व थॉमस पेन या विचारवंतांच्या राईट ऑफ थॉट्स या ग्रंथाचा त्यांच्यावर खूप प्रभाव पडला. बहुजन समाजातील अज्ञान, अंधश्रद्धा आणि दारिद्र पाहून ते खूप अस्वस्थ होत. जातपात, अस्पृश्य- स्पृश्य भेदभाव पाहून त्यांना खूप राग येत.

समाजातील अज्ञान अंधश्रद्धा दूर करून समाजातील जातीभेद नष्ट करण्याचा त्यांनी निश्चय केला. कोणताही धर्म ईश्वराने निर्माण केलेला नाही आणि चातुर्वर्ण्य व जातीभेद ही निर्मिती मानवाचीच आहे असे त्यांचे रोखठोक मत होते. सर्व मानव एकच आहेत म्हणून सर्वांनी गुण्यागोविंदाने राहावे असे त्यांचे मत होते. त्यांनी लिहिलेल्या शेतकऱ्यांचा आसूड या पुस्तकातून महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची विदारक दुर्दशा आणि दारिद्र्याची वास्तवता विशद केली आहे. या पुस्तकाद्वारे विशाल दृष्टिकोनाचे क्रांतिकारक म्हणून महात्मा फुलेंचे दर्शन होते. महात्मा फुले यांनी सार्वजनिक सत्यधर्म हा ग्रंथ लिहिला. हा ग्रंथ सत्यशोधक समाजाचा प्रमाण ग्रंथ मानला जातो. तुकारामांच्या अभांगाचा त्यांना गाढा अभ्यास होता. अभंगाच्या धर्तीवर त्यांनी अनेक अखंड रचले. त्यांना सामाजिक विषमतेचे जागतिक भान होते म्हणूनच आपला गुलामगिरी हा ग्रंथ त्यांनी अमेरिकेतील कृष्णवर्णीयांना समर्पित केला. अस्पृश्यांची कैफियत हा त्यांचा अप्रकाशित ग्रंथ आहे. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुले यांचे निधन झाले. आज त्यांच्या जन्म दिनी त्यांचे स्मरण करणे हे आपले कर्तव्यच आहे. **महात्मा फुलेंना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!**

**- श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## महात्मा फुले..

भिडेवाडा धन्यधन्य
शाळा पहिली खुले
काळ करे कुर्निसात
अद्भुत दाम्पत्य फुले

मनुवादी धर्म मार्तंड
किती आडवे आले
फुलेंच्या रूद्रावतारा
चळ चळा ते भ्याले

आसरा तव लाभता
सनाथ अनाथ मुले
नारी अत्याचार पाहे
काळीज चरार उले

भ्रूणहत्या पारिपत्य
समाजा जागृत केले
मुलीला शाप समजे
सारे डाग पुसून गेले

बाल जरठ क्रूर लग्न
अथकप्रयासे थांबले
विधवापुत्रास दत्तक
यशवंत नाम लाभले

बंद विधवाकेशवपन
कार्य कर्मठा झोंबले
धर्म बुडाला बोलणारे
दात खिळूनि थांबले

सत्यशोधक आश्रमा
गणिका आश्रय मिळे
विधवा पुनर्विवाहानी
कपाळी मिरवे टिळे

प्लेग रोग संसर्गजन्य
माहीत होते तुजभले
तरी राहिली कार्यरत
अंती जीवन अर्पीले

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६**

अक्षराज
अचूक वृत्त, अचूक बातमी

# क्रांतीसूर्य ज्योतिबा फुले तुम्ही होतात म्हणून...

एकीकडे इंग्रजांची जुलमी राजवट आणि दुसरीकडे वर्ण भेदाचा कडेलोट आणि जाती भेदाची अमानुष प्रथा यांमुळे शुद्र व अतिशुद्रांना जीवन जगणे कठीण झाले होते.शुद्रांचा छळ करणे, शुद्रांना गुलाम बनवणे,शुद्रांचा पदोपदी अपमान करणे हा उच्च वर्णियांचा आवडता छंद झाला होता. स्त्रियांची अवस्था तर शुद्रांपेक्षाही जास्त बिकट होती. एवढी भयंकर सामाजिक विषमता व अमानुष परिस्थिती असताना क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले तुम्ही आपल्या कणखर व निडर समाजकार्याने सामाजिक, शैक्षणिक,सांस्कृतिक,कृषी व आर्थिक क्षेत्रात क्रांती घडवून आणलात त्याला तोड नव्हती. तेव्हाचे धर्माचे ठेकेदार व समाजकंटक यांनी मिळून तुम्ही शिक्षणाचा प्रसार व प्रचार करू नये म्हणून,समाजसुधारणा करू नये म्हणून तुम्हाला व सावित्रीमाईंना प्रचंड विरोध केला,काही प्रसंगी तुम्हाला जीवे मारण्याची धमकी दिली.परंतु,तुम्ही व सावित्रीमाई जराही डगमगले नाहीत.तुम्ही धैर्याने व खंबीरपणे तुमचा सामाजिक लढा लढतच राहिलात.

भारतात सर्वप्रथम स्त्रियांना व मागासवर्गीयांना शिक्षणाची दारे तुम्ही खुले केली.हा फार मोठा ऐतिहासिक आणि क्रांतिकारी लढा होता.तुम्ही व सावित्रीमाईंनी अनेक सामाजिक लढे लढून सामाजिक परिवर्तन घडवून आणले, इतकेच नाही तर सत्यशोधक समाजाच्या माध्यमातून समाजसुधारणा केली. तुम्ही थोर विचारवंत होतात , सामाजिक विषमतेचे जाणकार होतात आणि समस्त अबला स्त्रियांच्या दु:खाचे कारण तुम्हाला कळले होते. केवळ तुमच्यामुळे महाराष्ट्रात व भारतात सामाजिक क्रांतीचा पाया मजबूत झाला.हेच लक्षात घेऊन जागतिक कीर्तीचे ज्ञानसूर्य,संविधान निर्माते, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तुम्हाला गुरू मानले.ही एक ऐतिहासिक घटना आहे हे विसरून चालणार नाही.

क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा आज तुमची जयंती आहे.याचा आम्हाला सार्थ अभिमान आहे. तुम्ही होतात म्हणून आम्हाला शिक्षणाची दारे खुली झाली.तुम्ही व सावित्रीमाई होतात म्हणून भारतीय स्त्रियांना शिक्षण,मान सन्मान व सामाजिक प्रतिष्ठा मिळाली.ज्योतिराव केवळ आपल्यामुळेच जुलमी इंग्रजांना शेतकऱ्यांचे,स्त्रियांचे आणि मागासवर्गीयांचे दु:ख व दरिद्री जगणे कळाले.इंग्रजांच्या मदतीने अनेक कायदे करून तुम्ही अनिष्ठ व वाईट रूढी परंपरा मोडीत काढल्या. विधवांचे केशवपन बंद केलात,गरोदर विधवांचे बाळंतपण करून होणाऱ्या बालहत्या बंद केलात.विधवांचे लग्न लावून दिलात.सार्वजनिक पाणवठ्यावर पाणी प्यायला बंदी असणाऱ्या व तहानलेल्या मागासवर्गीय बंधू भगिनींना आपल्या घरातील पाण्याचा हौद खुला करून त्यांना पाणी प्यायला देणे ही त्याकाळी साधी गोष्ट नव्हती! महात्मा ज्योतिबा फुले आपण होतात म्हणून महाराष्ट्रासह भारतातील सामाजिक विषमतेला व वाईट चालीरितींना कायमचे तडे गेले.तुम्ही होतात म्हणून शेतकऱ्यांची पिळवणूक थांबली. केवळ तुमच्यामुळे मोफत प्राथमिक शिक्षण सुरू झाले आहे.

केवळ तुमच्यामुळे आम्हाला मनुष्य म्हणून गणले जात आहे.तुम्ही सत्यशोधक समाजाची स्थापना केली आणि सरकारच्या कार्याचे धिंडवडे काढले.तुम्ही होतात म्हणून शिक्षणाच्या माध्यमातून बहुजन रयतेला त्यांचे हक्क ज्ञात झाले व हक्कासाठी ते रस्त्यावर उतरले.आणि त्यामुळे सत्यशोधक समाजाचे कार्य प्रभावी ठरले. महात्मा फुलेजी तुम्ही गुलामगिरी, आसूड, छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा यासारखे अनेक ग्रंथ लिहिले आहेत.रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या कार्याचा गौरव तुम्ही केलात, छत्रपती शिवाजी महाराजांवर तुम्ही पोवाडे लिहिलात,सर्व प्रथम तुम्ही छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी केलात त्यामुळे आम्हाला छत्रपती शिवाजी महाराजांच्या दैदिप्यमान कार्याची व इतिहासाची ओळख झाली. आणि आम्ही धन्य झालो.महात्मा ज्योतिबा फुलेजी तुम्ही व्यक्ती म्हणून एक सर्वोत्तम असे ग्रेट पर्सन होतात.समासुधारकांच्या रांगेत तुमचा पहिला क्रमांक लागतो.तुम्ही होतात म्हणून आज आमच्या जीवनाचे सोने झाले आहे.महात्मा ज्योतिबा फुलेजी तुमच्या जयंती निमित्त तुमच्या चरणी कोटी कोटी वंदन! तुमच्या सामाजिक व शैक्षणिक कार्याला नतमस्तक होऊन साष्टांग दंडवत!

**- बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर.मो.९५४५४४२६४८**

## समाज एकता मनसे चषक २०२५ स्पर्धेचा चषक अनावरण व टी-शर्ट वाटप...



**अक्षराज : उदय दणदणे**

**दि.१०, शृंगारतळी (गुहागर) :** उद्योजक तसेच महाराष्ट्र नवनिर्माण सेना गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी आयोजित समाज एकता मनसे चषक २०२५ स्पर्धेचा चषक अनावरण व टी-शर्ट वाटप कार्यक्रम बुधवार दिनांक ०९ एप्रिल २०२५ रोजी ओमकार मंगल कार्यालय, शृंगारतळी येथे संपन्न झाला. सदर कार्यक्रमाच्या व्यासपीठावर क्रिकेट स्पर्धेत सहभागी झालेले गुहागर तालुक्यातील एकूण १२ संघाचे समाज नेते व अध्यक्ष तसेच संघ प्रमुख,कर्णधार यांची लक्षवेधी उपस्थिती होती.

महाराष्ट्र नवनिर्माण सेना गुहागर तालुका संपर्क अध्यक्ष प्रमोद गांधी आयोजित समाज एकता मनसे चषक २०२५ एक समाज एक संघ गुहागर तालुक्यात प्रथमच ह्या आगळीक अशा भव्य दिव्य क्रिकेट स्पर्धेकडे कोकणातील क्रीडा विश्वात अवघ्यांचे लक्ष वेधले आहे.सदर स्पर्धा दिनांक ११ ते १४ एप्रिल २०२५ रोजी गोल्डन पार्क (जाणवले फाट्याच्या समोर) शृंगारतळी येथे संपन्न होत आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

अक्षराज

# थोडक्यात

## टाकळी ढोकेश्वर येथे आज भैरवनाथाचा यात्रोत्सव



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.१०, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील टाकळीढोकेश्वर येथिल ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ महाराज यात्रा उत्सव शुक्रवार, दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी साजरा होत आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती यात्रा कमिटीच्या वतीने देण्यात आली. सकाळी ६ वा. काळभैरवनाथ महाराज मूर्तीला अभिषेक, पूजन होईल, सकाळी १० वाजता भव्य काठी मिरवणूक काढण्यात येणार आहे. सायंकाळी ६ वाजता श्री भैरवनाथ (बांडेमळा) मित्रमंडळाच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ८ वाजता जागरण गोंधळाचा कार्यक्रम होईल. त्यानंतर रात्री ९ वाजता भव्य छबिना वाजतगाजत मिरवणूक काढण्यात येणार आहे. परिसरातील भाविकांनी या यात्रा उत्सवात सहभागी होण्याचे आवाहन श्री भैरवनाथ प्रतिष्ठान बांडेमळा व यात्रोत्सव कमिटीने केले आहे.

## सावकाराची हत्या करुन पलायन करणाऱ्या आरोपींना वडगाव निंबाळकर पोलिसांकडून अटक




**अक्षराज : शरद भगत**

**दि.०९, वडगाव निंबाळकर (बारामती) :** बारामती तालुक्यातील सोरटेवाडी येथे २७ वर्षीय तरुणाची हत्या करणारे आरोपी खून केल्या नंतर विविध ठिकाणी पळून गेले होते. वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशनमध्ये या बाबत फिर्याद दिल्या नंतर अवघ्या ४८ तासांत या गुन्ह्यातील आरोपींना गजाआड करण्यात आल्याची माहीती पत्रकार परिषदेत उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांनी वडगाव निंबाळकर येथे सांगितले. बारामती तालुक्यातील सोरटेवाडी येथील सोरटेवाडी-शेंडकरवडी हद्दीतील कुलकर्णी चारी ते शेंडकरवाडी रस्त्यावर गोरख खेंद्रे यांच्या पोल्ट्री फार्म जवळ एका २७ वर्षीय रोहित गाडेकर याची हत्या झाल्याचे स्थानिक नागरिकांच्या निदर्शनास आल्या नंतर नागरिकांनी करंजेपुल दुरक्षेत्र पोलीस स्टेशन ला घडलेल्या घटनेची माहिती दिली. करंजे पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस उपनिरिक्षक साबळे यांनी वडगाव निंबाळकर पोलिस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरिक्षक सचिन काळे यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेली घटना त्याचे कारण शोधून काढत आरोपींना कसे पकडायचे याचे नियोजन केले. चौकशी वेळी असे आढळून आले की, मयत रोहित गाडेकर याने आरोपी अमोल माने व सागर माने यांना व्याजाने १५ लाख रुपये दिले होते. दिलेल्या रखमेचे व्याज व मुद्दल मिळवण्यासाठी मयत रोहित गाडेकर यांना संपर्क साधून पैश्याची मागणी करायचा याचाच राग धरुन आरोपी अमोल माने, सागर माने तसेच त्यांचा मित्र विक्रम काकासो मासाळ यांनी रोहित गाडेकर ला जीवे मारण्याचे कारस्थान रचून मयत रोहित ला कुलकर्णी चारी जवळील खेंद्रे यांच्या पोल्ट्री फार्म जवळ बोलवून घेऊन धारदार शास्त्राने वार करत रोहित याचा खून करुण पळून गेले होते. यातील सागर माने व विक्रम मासाळ अशा २ आरोपींना चाकण पोलीसांनी अटक केले होते. तर तिसरा आरोपी हा कर्नाटक राज्यातील निडगुंडी येथून ताब्यात घेत अटक केली आहे.

या खुनाच्या आरोपींना ४८ तासांत अटक केल्याने वडगाव निंबाळकर पोलीस स्टेशनचे कौतुक परिसरातून ऐकायला मिळत आहे. अटक केलेल्या तिन्ही आरोपीनीं गुन्हा कबुल केला आहे. अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांनी वडगाव निंबाळकर येथे दिली.ही कामगिरी पोलीस अधिक्षक पंकज देशमुख, अप्पर पोलीस अधिक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन राठोड यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शोध पथकाचे पोलीस निरीक्षक अविनाश शिळीमकर,सहाय्यक पोलीस निरिक्षक सचिन काळे, उपनिरिक्षक राहुल साबळे, पोलीस अंमलदार अनिल खेडकर, पोपट नाळे, हृदयनाथ देवकर, महेश पन्हाळे,सूर्यकांत कुलकर्णी, भाऊसाहेब मारकड, रमेश नागटिळक, अमोल भोसले, सागर देशमाने, स्थानिक गुन्हेशाखेचे बाळासाहेब कारंडे, सुनिल बालगुडे, दिपक वारुळे, सागर चौधरी, कुंडलिक कडवळे, आबा जाधव, सुरज धोत्रे, विलास ओमासे, निलेश जाधव, नागनाथ परगे, भानुदास सरक, धनंजय भोसले, राजू मोमीन आदींनी केली.

## जिल्ह्यात १४ एप्रिलला 'कोरडा दिवस'; मद्यविक्री बंद ठेवण्याबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडून आदेश जारी

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१०, बुलडाणा :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दिनी दिनांक १४ एप्रिल २०२५ रोजी बुलडाणा जिल्ह्यातील सर्व देशी व विदेशी किरकोळ मद्य विक्री अनुज्ञप्त्या, बिअर शॉपी विक्री बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी निर्गमित केले आहेत. जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने मुंबई दारूबंदी कायद्यामधील कलम अन्वये अधिकाराचा वापर करून बुलढाणा जिल्ह्यातील सर्व किरकोळ मद्य विक्री अनुज्ञप्त्या सीएल-३, एफएल-२, सीएलटीओडी-३, एफएलबीआर-२, एफएल-३ आदी सर्व दि. १४ एप्रिल रोजी संपूर्ण दिवस बंद ठेवण्याचे आदेश जिल्हाधिकारी निर्गमित केले आहेत. अनुज्ञप्तीधारकांनी व संबंधितांनी या आदेशाचे पालन न केल्यास त्यांच्याविरुद्ध नियमानुसार योग्य ती कारवाई करण्यात येईल, असा इशारा ही आदेशाद्वारे देण्यात आला आहे.

# महात्मा ज्योतिराव फुले यांची जयंती



समाजाचे दगड धोंडे आपल्या अंगावर घेत या राष्ट्राला शिक्षणाचे महत्त्व सांगितले, अशे थोर समाज सुधारक महात्मा जोतिबा फुले यांची आज जयंती आहे. साताऱ्यातील कटगुण या गावी ११ एप्रिल १८२७ रोजी जोतिबा फुले यांचा जन्म झाला.

गोविंदराव फुले आणि चिमणाबाई यांच्या पोटी ज्योतिबा फुले यांचा जन्म झाला. महात्मा फुले यांचे मूळचे आडनाव हे गोऱ्हे असे होते, मात्र त्यांचा फुले विकण्याचा व्यवसाय असल्यामुळे त्यांना फुले हे आडनाव पडले.

जोतीराव केवळ नऊ महिन्यांचे होते, तेव्हा त्यांच्या आईचे निधन झाले. जोतीबांचा विवाह वयाच्या तेराव्या वर्षी सावित्रीबाई फुले यांच्याशी झाला. प्राथमिक शिक्षणानंतर काही काळ त्यांनी भाजी विक्रीचा व्यवसाय केला. इ.स. १८४२मध्ये माध्यमिक शिक्षणासाठी पुण्याच्या स्कॉटिश मिशन हायस्कूलमध्ये त्यांनी प्रवेश घेतला. बुद्धी अतिशय तल्लख, त्यामुळे पाच-सहा वर्षातच त्यांनी अभ्यासक्रम पूर्ण केला. अँतोनियो ग्राम्सी या प्रसिद्ध तत्त्ववेत्त्याने महात्मा फुले यांना 'सेंद्रिय बुद्धिवंत' असे संबोधले आहे.जोतीराव करारी वृत्तीचे होते. त्यांस गुरुजनांविषयी व वडीलधाऱ्या माणसांविषयी फार आदर वाटत असे. ते आपला अभ्यास मन लावून करत असत. परीक्षेत त्यांना पहिल्या श्रेणीचे गुण मिळत असत. शाळेतील शिस्तप्रिय, हुशार विद्यार्थी म्हणून त्यांचा नावलौकिक होता.

त्यावेळी पुण्यात बरेच कबीरपंथी फकीर येत असत. चांगले लिहायला व वाचायला येणाऱ्या जोतीरावकडून काही कबीरपंथी फकीर रोज महात्मा कबीरांचा 'बीजमती' हा ग्रंथ वाचून घेत असत. त्यामुळे जोतीरावांच्या मनावर कबीराच्या विचारांची शिकवण चांगलीच बिंबली.

देशाच्या इतिहासात फुले शाहू आंबेडकर यांच्या विचारावर सामाजिक सुधारणा करण्यात येतात. त्यामुळे महात्मा फुले हे पहिल्या पिढीतील समाज सुधारक असल्याचे स्पष्ट होते. महात्मा फुले यांनी त्या काळात इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवून अनेक इंग्रजी ग्रंथाचे पारायण केले. त्यांच्या मनावर अमेरिकन राज्य क्रांतीसह द राईट्स ऑफ मॅन या ग्रंथाचा चांगलाच परिणाम झाला होता. थॉमस पेन या सुधारणावादी विचारवंताचा त्यांच्यावर चांगलाच प्रभाव होता. त्यामुळेच महात्मा फुलेंनी जातीभेद हा खोटा असल्याचे ठामपणे मांडले. महात्मा फुले यांनी शिक्षणासह वस्ताद लहुजी साळवे यांच्याकडे दांडपट्टा आणि मल्लविद्येचेही शिक्षण घेतले होते. त्यामुळे महात्मा

फुले यांनी कोणाचीही तमा न बाळगता आपल्या सामाजिक सुधारणेचा यज्ञ धगधगता ठेवला होता. ज्योतिबांनी अनेक ग्रंथांचे लिखाण सुद्धा केलेले आहे, शेतकऱ्याचा असूड, ब्राम्हणांचे कसब, अश्या अनेक प्रकारच्या ग्रंथांमधून त्यांनी समाज प्रबोधन केले होते, सावित्रीबाई आणि ज्योतिबा फुले यांनी ब्रिटिश राजवटीत १८४८मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी पहिली भारतीय शाळा सुरू केली. प्रवाहाच्या विरुद्ध दिशेला तेच पोहू शकतात ज्यांचे निर्धार ठाम असतात, ज्यांना कुठलेतरी ध्येय गाठायचे असते. असे म्हणणाऱ्या ज्योतीबांनी २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. समाजातील विषमता नष्ट करणे व तळागाळातील समाजापर्यंत शिक्षण पोहचवणे, हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते. महात्मा फुले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली; तेव्हा स्त्री विभागाचे नेतृत्व सावित्रीबाई यांनी केले. सावित्रीबाई यांच्याबरोबर १९ स्त्रियांनी सत्यशोधक समाजाचे कार्य सुरू केले. महाराष्ट्रातील तळागाळापर्यंत ही चळवळ पोहोचली. छत्रपती शाहू महाराजांनी सत्यशोधक चळवळीस पाठिंबा दिला. 'सर्वसाक्षी जगत्पती । त्याला नकोच मध्यस्ती ।।' हे या समाजाचे घोषवाक्य होते. सत्यशोधक समाजाने गुलामगिरीविरुद्ध आवाज उठविला आणि सामाजिक न्यायाची व सामाजिक पुनर्रचनेची मागणी केली. महात्मा फुले यांनी जीव वाचवलेल्या काशीबाईच्या यशवंतला दत्तक घेऊन त्यांनी यशवंतला चांगले शिक्षण दिले. त्याच्या विधवा आईची काळजी घेतली. फुले दाम्पत्यांनी काशीबाईसारखी स्थिती इतर महिलांची होऊ नये, यासाठी बालहत्या प्रतिबंधक गृहाची १८६३ ला स्थापना केली. त्या माध्यमातून महिलांसाठी कार्य केले. विधवांच्या केशवपणालाही त्यांनी विरोध करत चळवळ उभी केली.

महात्मा फुलेंनी ब्राह्मणांचे कसब,गुलामगिरी असे ग्रंथ लिहून समाजावर आपल्या लेखणीचे आसूड ओढले. समाजसुधारक विठ्ठलराव कृष्णजी वांडेकर यांनी ज्योतिराव फुले यांना महात्मा ही पदवी दिली होती. जुलै १८८७मध्ये ज्योतिराव फुले यांना पक्षाघाताचा आजार झाला. २८ नोव्हेंबर १८९० रोजी महात्मा फुलेंचे मध्यरात्री २ वाजता पुणे येथे वयाच्या ६३ व्या वर्षी निधन झाले. अत्यंयात्रेच्यावेळी जो टिटवे धरतो त्याला वारसा हक्क मिळत असल्याने ज्योतिरावाचे पुतणे आडवे आले आणि ज्योतिरावांचा दत्तक पुत्र यशवंतरावांना विरोध करू लागले. त्यावेळेस सावित्रीबाई धैर्याने पुढे आल्या व स्वत: टिटवे धरले. अंत्ययात्रेच्या अग्रभागी चालल्या आणि स्वत:च्या हाताने ज्योतिरावांच्या पार्थिवाला अग्नी दिला. यशवंतराव हा विधवेचा मुलगा असल्याने त्याला कुणीही मुलगी द्यायला तयार नव्हते. तेव्हा कार्यकर्ता ज्ञानोबा कृष्णाजी ससाणे यांच्या राधा नावाच्या मुलीशी ४ फेब्रुवारी १८८९ रोजी विवाह यशवंतचा करून दिला. यशवंत व राधा यांचा हा विवाह महाराष्ट्रातील पहिला आंतरजातीय विवाह होय. महात्मा फुले हे महाराष्ट्रातील एक सामाजिक कार्यकर्ते, विचारवंत, जातिविरोधी समाजसुधारक आणि लेखक होते. सामाजिक प्रबोधन, अस्पृश्यता व जातिव्यवस्थेचे निर्मूलन, आणि स्त्रियांना व मागास जातीच्या लोकांना शिक्षण देण्याचे कार्य त्यांनी कार्य केले. समाज सुधारणेचा पाया घातलेल्या या थोर महापुरुषाची ११ एप्रिलला जयंती आहे. त्यानिमित्त महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना मानाचा मुजरा.

**लेखक : श्रीराम महाजन**
**कलाशिक्षक**
**चेंबूर कर्नाटका हायस्कूल.**
**चेंबूर. मुंबई**

## लोकतंत्र सेनानींचा आवाज बुलंद केल्याबद्दल आ.मुनगंटीवार यांचे मानले आभार

### विधानसभेत लक्षवेधीच्या माध्यमातून सरकारचे वेधले होते लक्ष



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, चंद्रपूर :** आणीबाणीच्या काळात कुटुंबाचा आणि स्वतः चा जराही विचार न करता केवळ राष्ट्र सर्वोपरी म्हणून देशासाठी कारावास भोगून संघर्ष करणाऱ्या लोकतंत्र सेनानींचा आवाज विधानसभेत बुलंद केल्याबद्दल लोकतंत्र सेनानी संघाने राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांचे आभार मानले आहेत.

लोकतंत्र सेनानींना मानधन मिळण्यात व इतर प्रशासकीय बाबींमध्ये येत असलेल्या अडचणींचे निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी संघटनेच्या शिष्टमंडळाने आ. मुनगंटीवार यांची अलीकडेच प्रत्यक्ष भेट घेतली. लोकतंत्र सेनानी संघाचे (जालना, परतूर) कार्याध्यक्ष रघुनाथ दीक्षित, महासचिव विश्वास कुलकर्णी (जळगाव), प्रदीप ओगले (सांगली), अरुण भिसे (यवतमाळ), पांडुरंग जिंजुर्डे (यवतमाळ) आणि यादवराव गहूकार (यवतमाळ) यांनी आ. मुनगंटीवार यांची भेट घेतली. लोकतंत्र सेनानींच्या सन्मान निधित भरीव वाढ करण्याची मागणी आ.सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदनाद्वारे केली होती. आ. मुनगंटीवार यांनी निवेदनामध्ये राजस्थान सरकारच्या निर्णयाचा दाखला दिला आहे. आणीबाणीमुळे देशाच्या लोकशाहीचे महत्त्व लक्षात घेऊन लोकतंत्र सेनानी म्हणून ज्यांनी कारावास भोगला. त्या सर्व लोकतंत्र सेनानींचा सन्मान करणे ही शासनाची जबाबदारी आहे, असे निवेदनात म्हटले आहे.

राजस्थान सरकारने लोकतंत्र सेनानी सन्मान म्हणून पेन्शन राशी २० हजार रुपये केली आहे. तसेच आरोग्य चिकित्सा सहाय्य म्हणून ४ हजार रुपयांची राशी दर महिन्याला तेथे दिली जाते. महाराष्ट्रात सध्यस्थितीत ४ हजार १०३ स्वातंत्र्य सेनानी सन्मान निधीस पात्र आहेत. राजस्थान सरकारची अधिसूचना लक्षात घेऊन महाराष्ट्रात देखील हा सन्मान निधी वाढविण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घ्यावा, अशी विनंती आ. मुनगंटीवार यांनी केली आहे.

विधानसभेतील चर्चेत विविध मतदारसंघांच्या आमदारांनी सहभागी होणे. तसेच हा मुद्दा सरकारच्या लक्षात आणून देणे, हे केवळ आ. मुनगंटीवार यांच्यामुळे शक्य झाले आहे. तसेच आ. मुनगंटीवार यांनी दिलेल्या निवेदनावर देखील कार्यवाही करण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. आणीबाणीमध्ये लोकशाहीच्या रक्षणासाठी समर्पितपणे लढणाऱ्या सेनानींसाठी आ. मुनगंटीवार यांनी घेतलेल्या पुढाकाराबद्दल आम्ही कृतज्ञ आहोत, या शब्दांत लोकतंत्र सेनानी संघाने आभार व्यक्त केले आहेत.

**ताम्रपत्रासाठी प्रयत्न करण्याचा शब्द -**

सर्व सेनानींना सरकारतर्फे ताम्रपत्र देण्याची विनंती संघटनेतर्फे करण्यात आली. यावर सरकारदरबारी नक्की प्रयत्न करणार, असा शब्द आ. मुनगंटीवार यांनी दिला. यासोबतच सेनानींच्या निधनानंतर त्यांच्या वारसदारांना मिळणारे मानधन बंद झाल्याचा मुद्दा ही आ. मुनगंटीवार यांनी नोंदवून घेतला. त्यासाठी अधिकाऱ्यांशी चर्चा करून प्रश्न मार्गी लावणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## २५ पेक्षा जास्त वाहन मालकांची मागणी आल्यास जागेवरच फिटमेंट शुल्काशिवाय 'एचएसआरपी' बसवून मिळणार

**अक्षराज : जे.के.पोळ**

**दि.१०, ठाणे :** उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) उत्पादक निवासस्थानी किंवा व्यवसायाच्या ठिकाणी वाहनावर पाटी बसवण्याची सेवा देऊ शकतात. निवासी कल्याण संघटना, सोसायटी येथे शिबिर आयोजित करू शकतात. एका ठिकाणी किमान २५ किंवा त्यापेक्षा जास्त वाहन मालकांनी निवासस्थानी, व्यवसायाच्या ठिकाणी किंवा निवासी कल्याण संघटना, सोसायटीमध्ये वाहनांवर एचएसआरपी बसविण्याची एकत्रित बुकिंग केल्यास कोणतेही अतिरिक्त फिटमेंट शुल्क न आकारता उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्यात येणार आहे. राज्यात १ एप्रिल २०१९ पूर्वीची नोंदणी केलेल्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्यात येत आहे. अशा जुन्या वाहनांना ही पाटी बसविण्याकरिता तीन उत्पादकांची परिवहन विभाग मार्फत निवड केली आहे. वाहन मालकांनी वाहनांवर ही पाटी बसविण्यासाठी परिवहन विभागाच्या https://transport.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी बसविण्याकरिता शुल्काचा भरणा ऑनलाईन पद्धतीने करावा. ही पाटी बसविण्या करता वाहन मालकांनी वैयक्तिकरित्या होम फिटमेंट सर्विस या पर्यायाचा वापर केल्यास त्यांना अतिरिक्त शुल्काचा भरणा करावा लागणार आहे. उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी संचासह बसविण्याचे जीएसटी वगळून शुल्क दुचाकी वाहने व ट्रॅक्टर ४५० रुपये, तीन चाकी वाहने ५०० रुपये, हलकी वाहने, प्रवासी कार, मध्यम व जड वाहने ७४५ रुपये शुल्क अदा करावे लागणार आहे. या शुल्काशिवाय इतर कुठलेही शुल्क अनुज्ञेय नाही. काही फिटमेंट केंद्रामध्ये जुन्या वाहन नोंदणीच्या पाटी काढायचे शुल्क घेतले असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. तरी नागरिकांच्या याविषयी काही तक्रारी असल्यास त्यांनी ०२२ - २०८२६४९८ या क्रमांकावर आणि hsrpcomplaint.tcogmail.com`m ईमेलवर कराव्यात असे आवाहन सहपरिवहन आयुक्त शैलेश कामत यांनी केले आहे.

# अपधूप खंडेरायाच्या यात्रा उत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात

## ४०० वर्षाची परंपरा खंडोबा यात्रा उत्सव

**अक्षराज : राजकुमार इकडे**

**दि.१०, सुपा (अहिल्यानगर) :** प्रतिपाली असलेले अपधूप खंडेरायाच्या यात्रा उत्सवाची तयारी अंतिम टप्प्यात लाखो भाविक घेणार दर्शन चैत्र पौर्णिमा शनिवार, दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी यात्रा उत्सव होणार असल्याची माहिती श्रीक्षेत्र खंडेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष किसन साहेबराव गवळी, उपाध्यक्ष संतोष भगवंत गवळी यांनी दिली आहे. नगर पुणे महामार्गा लगत सुपा पासून अवघ्या ३ किलोमीटर असलेल्या अपधूप गावालगत प्रतिपाली म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पारनेर तालुक्यातील अपधुप येथील खंडेश्वर देवस्थानचा यात्रा उत्सव शनिवार, दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी संपन्न होत असून ४०० वर्षाची परंपरा असलेल्या खंडेरायाच्या यात्रा उत्सव चैत्र पौर्णिमेला होतो.




या उत्सवात महाराष्ट्रातील लाखो भाविक भक्त दर्शनासाठी येत असतात. यात्रेच्या दिवशी खंडेरायाचा अभिषेक संपन्न होतो. नंतर देवाला नवीन वस्त्र अलंकाराने परिधान केले जाते. आरती झाल्याच्या नंतर संपूर्ण ग्राम स्थ देवाला पाणी घालण्यासाठी भक्तीमय वातावरणाम ध्ये रात्रभर ग्रामस्थ भाविक भक्त येत असतात. पहाटे खंडेरायाची महाआरती होऊन यात्रा उत्सवास प्रारंभ होतो दिवसभर भाविकांची दर्शनासाठी रिघ लागलेली असते.

भाविक भंडारा खोबऱ्याची उधळण करत रात्री १२ वाजता विज्ञानाला आव्हान देणारा १२ गाड्याचा कार्यक्रम होतो. त्यानंतर देवाचा छबिना निघतो. यावेळी शोभेची दारू मोठ्या प्रमाणात आतकबाजी केली जाते. दुसऱ्या दिवशी कुस्त्यांचा जंगी हंगामा भरला जातो. गेली ५ वर्षापासून प्रसिद्ध उद्योगपती सुरेश शेठ धोंडीबा गवळी यांच्या यात्रा उत्सवनिमित्त १ लाख रुपयांची देणगी देत असतात तीच परंपरा याही वर्षी त्याच पद्धतीने चालू करण्याचा जाहीर केले आहे. श्रीक्षेत्र खंडेरायाच्या जीर्णोद्धारमध्ये मोलाचे सहकार्य गवळी यांच्या असून त्यांच्या आर्थिक योगदानातून भव्य कमान लॉन नारळाची झाडे गाभाऱ्यामधील मखर अशा प्रकारची चांगली कामे सुरेश शेठ धोंडीबा गवळी साहेबांच्या माध्यमातून झाली असून यापुढे मोठ्या प्रमाणात योगदान देण्याचे त्यांनी जाहीर केले आहे. त्याचबरोबर यात्रेदरम्यान मोठ्या प्रमाणात बंदोबस्त ठेवण्याचे देवस्थान ट्रस्टचे सचिव अशोक संपत गवळी यांनी सांगितले आहे.

मोठ्या प्रमाणात भंडाऱ्याची उधळण होईल असे देवस्थान ट्रस्टचे सहसचिव योगेश आनंदा गवळी यांनी सांगितले असून त्याचबरोबर यात्रा उत्सवाची संपूर्ण तयारी पूर्ण झाल्याचे खंडेश्वर देवस्थान ट्रस्टचे खजिनदार लक्ष्मण गणपत गवळी, सल्लागार रामचंद्र बाळाची गवळी, श्रीक्षेत्र खंडेश्वर देवस्थान ट्रस्ट अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव, सहसचिव, खजिनदार, सल्लागार व संपूर्ण विश्वस्त मंडळ गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य चेअरमन, व्हाईस चेअरमन व संचालक मंडळ पांडुरंग सेवा संस्था अध्यक्ष, उपाध्यक्ष, सचिव व विश्वस्त मंडळ तंटामुक्ती अध्यक्ष समिती शाळा व्यवस्थापन समिती व गावातील ग्रामस्थ व तरुण मंडळी यांनी सांगितले आहे.

# श्री साईबाबा पालखी शोभायात्रेत हजारोच्या संख्येत उसळला जनसागर

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०९, नागपूर :** भानेगाव येथील श्री साई मंदिरात वर्धापन दिन व पालखी सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित शोभायात्रेत हजारोच्या संख्येत जनसागर उसळला. शोभायात्रेत सर्वधर्म समभाव देखावे सामील करण्यात आले. शोभायात्रेचे मुख्य आकर्षण घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर व रमाई यांची झाकी ठरली. दिनांक ०८ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ६.३० वाजता श्री साईबाबा पालखी सोहळा व भव्य शोभयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता विलास मोटघरे, पोलीस निरीक्षक अरविंदकुमार कतलाम, सरपंच शालिनी चवरे, उपसरपंच सोनू बोरकर, रवींद्र चिखले, अनेस चवरे, आशिष उपासे, रामराव घुगल, डोमाजी निखाडे, क्रिष्णा चिकनकर श्यामराव सरोदे, रामेश्वर ढोके यांच्या हस्ते आरती व श्री साई पालखीची विविधत पूजा अर्चना करण्यात आली. यावेळी सुनील जालंदर, शंकर बोढे, राजू येलमुले, बापू शिंदूरकर, दीपक शिंदूरकर, नामदेव ढोके, निळकंठराव शिंदूरकर, नितीन म ोहिते, वसंता ढोके, अंकुश ढोके, सतीश शिंदूरकर यांच्यासह विश्व हिंदू परिषद व बजरंग दलाचे कार्यकर्ते उपस्थित होते. शोभायात्रा साई मंदिर, शिक्षक कॉलनी, उपासे ले आऊट, नविन बिना, प्रकाशनगर कॉलनी, राम मंदिर, पोलीस स्टेशन, रेल्वे चौकी, मुख्य बाजारपेठ, अन्नामोड आदि परिसरातून भ्रमण करून साई मंदिर भानेगाव येथे समारोप करण्यात आला.




शोभायात्रेत श्री साईबाबा, राम, लक्ष्मण, सीता, हनुमान, राधा कृष्ण, शंकर पार्वती, डॉ.बाबासाहेब आंबेडकर, रमाई, शिवाजी महाराज, तानाजी मालुसरे, बाजीराव पेशवे, बाजीप्रभू देशपांडे, झासी राणी, जीजा माता, अहिल्याबाई होळकर, सरस्वती माता. संभाजी कावजी कोंढाळकर, सिदोजी निंबाळकर, मावळे, आदी सजीव पात्र सामील करण्यात आले होते. शिवाजी महाराज, गजानन महाराज, हनुमान, खाटू श्याम महाराज आदी झाक्या साम ील करण्यात आल्या होत्या. शोभायात्रेत ११ घोडे, १० डिस्को लाईट बग्गी, बाभूळगाव बँड, डीजे साऊंड, आकर्षक रोषणाई व भजन मंडळ आदी सामील करण्यात आले होते.

शोभायात्रेचे ठीकठिकाणी जंगी स्वागत करण्यात आले. सामाजिक व राजकीय संघटनाकडून शरबत, पाणी, आलूभात, लस्सी, मठ्ठा, बुंदी, आईस्क्रीम आदि वितरण करण्यात आले. शोभायात्रा मार्गावर शेकडोंच्या संख्येत नागरिकांनी दुतर्फा गर्दी केली होती. यावेळी फटाक्यांची जोरदार आतिषबाजी करण्यात आली.

शोभायात्रा यशस्वी करण्यासाठी संकेत पापडकर, पीयूष चिकनकर, तन्मय ढोके, पार्थ शिंदूरकर, यश चिकनकर, अथर्व बोकडे, भावेश ढोके, प्रथमेश येलमुले, भावेश बोढे, प्रथमेश ढोके, दिपांशू शिंदूरकर, आशु भोयर, हेमंत चिकनकर, वंश शिंदूरकर आदींनी प्रयत्न केले.

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार मंचच्या व्याख्यानास प्रतिसाद

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.०९, धाराशिव :** व्यक्तिमत्त्वाचा विकास सामाजिक क्रांती आणि गुणात्मक शिक्षण अत्यावश्यक असल्याचे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले. तसेच स्वातंत्र्य, सम ता, बंधुता व न्याय याबरोबरच शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हे नव तत्त्वज्ञान बाबासाहेबांनी सांगून विसाव्या शतकाला वैचारिक वळण लावले असल्याचे प्रतिपादन विचारवंत तथा प्राचार्य नागोराव कुंभार यांनी दिनांक ०९ एप्रिल २०२५ रोजी केले. धाराशिव शहरातील सोनाई फंक्शन हॉलमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार मंचच्यावतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर व महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त दोन दिवशीय व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. पहिल्या दिवशी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार या विषयावर प्राचार्य डॉ.कुंभार बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ विचारवंत पन्नालाल सुराणा हे उपस्थित होते. पुढे बोलताना प्राचार्य डॉ. कुंभार म्हणाले की, डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्येला देव मानणारे होते. त्यामुळे शिक्षकांनी शिक्षण शिकविताना विज्ञाननिष्ठ द्यावे, पक्षपातीपणा करू नये असे सांगितले. तर शिक्षण मानसिक आणि बौद्धिक क्षमता वाढविण्यासह शिक्षण चिकित्सक वृत्ती वाढवीत असल्याचे बाबासाहेबांनी सांगितल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच शिक्षणाचा अर्थ जाणीव करून देणे असून शीर संवर्धन करण्याबरोबरच ज्ञान मिळते असेही त्यांनी सांगितले.

विशेष म्हणजे शिक्षण हे धर्मनिरपेक्ष असावे मात्र धर्म आधारित असू नये असे निक्षून सांगत ते म्हणाले की, शिक्षण हा प्रत्येकाचा हक्क असून ते प्राथमिकपासून उच्च शिक्षणापर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण असले पाहिजे आणि ती शासनाची जबाबदारी असावी असे त्यांनी स्पष्टपणे नमूद केले. तर पालकांसह विद्यार्थ्यांनी शिक्षणाला सर्वस्त स्थान देणे आवश्यक असून शिक्षक हा फोर मेन असल्याचे त्यांनी सांगितले. बाबासाहेबांनी समाज सुधारण्यासाठी विविधांगानी सलग २५ वर्ष चळवळी केल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी पन्नालाल सुराणा म्हणाले की, निवडणुकीमध्ये महिला व पुरुष लढत नाही हे आपले अपयश असल्यामुळे प्रत्येक महिला व पुरुषांनी निवडणूक लढविली पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. तर शिक्षणामुळे चारित्र्यसंपन्न होण्याबरोबरच शिक्षण हा तळागाळातील सर्वसामान्यांचा करता धरता व जीवन व्यापं असल्याचे त्यांनी नमूद केले. शिक्षणामुळे नोकरी बरोबरच राष्ट्राची उभारणी करता येत असल्याचे ते म्हणाले की अध्यापनातील वनवा काढल्या पाहिजेत असे आवाहन त्यांनी केले.



विशेष म्हणजे विषमतेवर आधारित असलेली समाज रचना बदलण्यासाठी विरोध करून ती समतेवर आधारित करण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करावेत, असे आवाहन सुराणा यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विचार मंचचे अध्यक्ष प्रा.रवी सुरवसे यांनी तर सूत्रसंचालन राजेंद्र अंगरखे यांनी व उपस्थितांचे आभार विकास काकडे यांनी मानले. या कार्यक्रमास माजी नगराध्यक्ष नानासाहेब पाटील, त्रिशाला ठाणांबीर, त्रिशाला गवळी, मनीषा ताकतिरे, शामल तापकिरे, लीना सोनकांबळे, सुदेश माळाळे आदींसह मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विचार मंचचे डॉ.रत्नाकर म्हस्के, प्रा.डॉ.दिनकर झेंडे, जगदीश जकाते, नागनाथ गोरसे, मारोती पवार, दीपक कांबळे, सी.के. मस्के, प्रा.ए.एस. कळासरे, अमोल गडबडे, डॉ.अजित कांबळे, मिलिंद जानराव, हनुमंत गायकवाड आदींसह पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# नॅशनल हायस्कूल मांदिवलीमध्ये नजीर वलेले यांचा सत्कार

**अक्षराज : उमेश तबिब**

**दि.१०, दापोली (रत्नागिरी) :** दि यंग पीपल्स एज्युकेशन सोसायटी मुंबई संचलित नॅशनल हायस्कूल मांदिवली मध्ये नुकतेच शिक्षण विस्तार अधिकारी नजीर अली वलेले यांचा सत्कार सोहळा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नजीर अली वलेलेहोते.मुस्तकिम मुकादम याने कुराण पठण केले. शाळेचे मुख्याध्यापक फैयाज यांनी नजीर वलेले यांचे स्वागत करताना प्रास्ताविक केले. जमादार व परकार यांनी नजीर अली वलेले यांच्याबद्दल माहिती सांगीतली.

पंचायत समिती दापोली येथे नजीर वलेले यांची शिक्षण विस्तार अधिकारी म्हणून निवड झाल्याबद्दल शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी जिल्हा परिषद उर्दू शाळेचे शिक्षक सहभागी झाले होते. शाळेचे मुख्याध्यापक फैयाज यांनी नजीर वलेले यांच्या शैक्षणिक सेवा वर प्रकाश टाकला. अध्यक्षीय भाषणात नजीर वलेले यांनी उर्दू माध्यम शिक्षणाचे महत्त्व व शिक्षकाची गुणवत्ता यांविषयी मार्गदर्शन केले. कार्यक्रम सूत्रसंचालन जमादार यांनी केले.

' कार्यक्रम यशस्वीतेबद्दल संस्था अध्यक्ष उस्मान मालवणकर, उपाध्यक्ष डॉ.अजीज सावंत, सचिव अ.कादीर खांचे, सहसचिव अस्लम जुवळे, शालेय समिती चेअरमन नूर मोहम्मद मुकादम, व्हाईस चेअरमन इक्बाल मुकादम, सदस्य जमालुद्दिन मुकादम, गुलाम हुसैन भारदे, पालक शिक्षक संघ उपाध्यक्ष मेहबूब मुकादम व पदाधिकारी, ग्रामस्थ, युवक यांनी अभिनंदन केले.

# थोडक्यात

## उपप्रादेशिक परिवहन कल्याण पथकाची धडक कारवाई

**अक्षराज : विश्वनाथ शेणोय**

**दि.०९, डोंबिवली (ठाणे) :** उपप्रादेशिक परिवहन कल्याण अधिकारी आशुतोष बारकुल यांच्या म ार्गदर्शनाखाली एका पथकाने दिनांक ०९ एप्रिल २०२५ रोजी दुपारच्या सुमारास इंदिरा चौक डोंबिवली पूर्व या ठिकाणी धडक टाकत रिक्षांवर जोरदार कारवाई केली. या कारवाई दरम्यान रिक्षा चालकांनी अडथळा आणण्याचा प्रयत्न करून एकच गोंधळ उडवून दिला. या कारवाईचे उद्देश म्हणजे उपप्रादेशिक परिवहन कार्यालयामध्ये बऱ्याच तक्रारी प्राप्त होत असून ३० ते ३५ रिक्षांवर चलनद्वारे भाडे नाकारणे, उदंड वर्तन, बॅच नसणे, पासिंग नसणे. अशा अनेक प्रकारच्या तक्रारी प्राप्त झाल्याने त्यांच्यावर कारवाई करण्यात आली. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी आशुतोष बारकुल यांनी सर्व रिक्षा धारकांना आपले कागदपत्र अद्यावत करण्याचे आवाहन केले आहे.



## परिषदेच्या वतीने जामसाळा जुना येथे शिक्षक व विद्यार्थी गुणगौरव समारंभ

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१०, चंद्रपूर :** महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद प्राथमिक विभाग तर्फे नवोदय / एकलव्य रेसिडेन्शिअल स्कूल यासाठी प्रवेश पात्र विद्यार्थी यांच्यासाठी मार्गदर्शन करणारे शिक्षक व प्रवेश पात्र विद्यार्थी यांच्यासाठी गुणगौरव समारंभ आयोजित करण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जामसाळा (जूना), पंचायत समिती सिंदेवाही, जिल्हा परिषद चंद्रपूर येथील मुख्याध्यापिका शैला बांगरे, स.शिक्षक रविंद्र धारणे, अविनाश सुरनर यांचा नवोदय / एकलव्य रेसिडेन्शिअल स्कूल प्रवेश पात्र विद्यार्थ्यांना उत्कृष्ट मार्गदर्शन केल्याबद्दल शिल्ड व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. त्याचप्रमाणे नवोदय प्रवेश पात्र ५ विद्यार्थी व एकलव्य रेसिडेन्शिअल स्कूल प्रवेश पात्र १० विद्यार्थी यांना प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी गावकरी यांचे वतीने सुद्धा शाल, श्रीफळ, सन्मान चिन्ह देऊन मार्गदर्शक शिक्षकांना गौरविण्यात आले. प्रवेश पात्र विद्यार्थी यांचा सुद्धा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष वैशाली चावरे यांनी भूषविले तर उद्घाटक प्रकाश चुनारकर हे होते. यावेळी दिनेश टिपले, नामदेव सुरपाम, अनुराधा दांडेकर, बारूलाताई नैताम, श्रीधर दांडेकर, प्रशांत चहांदे, राजेंद्र चौके, सुवर्णा गायकवाड, सुरेखा गायकवाड आणि बहुसंख्येने गावकरी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय नन्नावरे, सूत्रसंचालन छबुताई ढोणे तर उपस्थितांचे आभार विवेकानंद दांडेकर यांनी मानले. प्रकाश चुनारकर यांनी परिषदेच्या वतीने होत असलेल्या शिक्षक व विद्यार्थी यांच्या गुणगौरव समारंभाबद्दल भाष्य करून ग्रामीण भागातील जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षक करीत असलेल्या प्रेरणादायी कार्याबद्दल सूतोवाच केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष वैशाली चावरे यांनी काव्यातून शिक्षणाची महती पटवून मार्गदर्शक शिक्षक व प्रवेश पात्र विद्यार्थी यांच्यासंबंधी स्तुतीसुमने उधळली. शाळेच्या मुख्याध्यापिका शैला बांगरे यांनी सन २०१८ पासून शाळेने केलेल्या प्रगतीचा लेखाजोखा सादर करून शाळेला वेळोवेळी सहकार्याबद्दल गावकऱ्यांप्रती आभार व्यक्त केले.



**नवोदय प्रवेश पात्र ५ विद्यार्थी** – ओम दादाजी श्रीरामे, तेजस विनोद चौधरी, मोहिनी गणेश ढोणे, शंतनु आतेश सावसाकडे, श्रेयस सुनील मरगळे आणि एकलव्य प्रवेश पात्र दहा विद्यार्थी ओम दादाजी श्रीरामे, तेजस विनोद चौधरी, श्रेयस सुनील गरमळे, शंतनु आतेश सावसाकडे, नैतिक मनोहर रंदये, वेदांत खेमदेव गायकवाड, मंथन रविंद्र चौके, मोहिनी गणेश ढोणे, सृष्टी अरविंद गायकवाड, गणेश दिलीप बारेकर आदींचा समावेश आहे.

## जिल्हास्तरीय कोडींग स्पर्धेमध्ये धोंडेवाडी शाळेचे घवघवीत यश

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.१०, खंडाळा (सातारा) :** शैक्षणिक धोरण २०२० नुसार विद्यार्थ्यांनी २१ व्या शतकातील कौशल्य आत्मसात करावी व त्याबरोबरच मुलांमध्ये संगणकीय विचार, सहयोग, सांघिक कार्य तार्किक विचार आणि कोडिंग यांचे ज्ञान अवगत होण्यासाठी पुणे जिल्हा प्रशिक्षण संस्था पुणे, जिल्हा परिषद पुणे, लीडरशिप फॉर इक्विटी संस्था व ॲमेझॉन फ्युचर इंजिनियर यांच्या विद्यमाने २०२४ /२०२५ मध्ये कोडींग प्रशिक्षण शिक्षकांसाठी आयोजित करण्यात आले होते. कोडींग प्रकल्पांतर्गत जिल्ह्यातील शिक्षकांसाठी ऑनलाईन ब्लेंडेड कोर्स घेण्यात आला होता. यातून शिक्षक कम्प्युटेशनल थिंकिंग मधील लुपिंग सिक्वेन्सिंग यांसारख्या कोडींग संकल्पनांचा अभ्यासक्रमामध्ये वापर या घटकावर कोर्सची निर्मिती बनवण्यात आली होती. यासाठी जिल्ह्यातून १३०० शिक्षकांनी नोंदणी केली होती. यापैकी जिल्ह्यातून सर्वोत्कृष्ट २० शिक्षकांची निवड करण्यात आली.त्यामध्ये भोर तालुक्यातील जिल्हा परिषद शाळा धोंडेवाडी येथील मुख्याध्यापक जयवंत जाधव यांची जिल्हास्तरावर पाचव्या क्रमांकावर निवड झाली असून त्यांनी उत्कृष्टरित्या कोडींग च्या सर्व कौशल्यांचा वापर करून कोर्स वेळेत पूर्ण केला. भोर तालुक्यातून निवड झालेले ते एकमेव शिक्षक आहेत. सदर कार्यक्रमाचा पुरस्कार वितरण जिल्हा परिषद पुणे येथील यशवंतराव चव्हाण सभागृहामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील उपशिक्षणाधिकारी मोमीन व गच्चे, वैशाली बच्छाव, साईप्रसाद, तुषार झा श्रुती कुलकर्णी, महेश म्हेत्रे यांच्या उपस्थितीत जयवंत जाधव यांना लॅपटॉप व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच धोंडेवाडी शाळेतील पदवीधर शिक्षिका सविता तनपुरे यांनी ४२ शिक्षकांना कोडींगचे प्रशिक्षण व मार्गदर्शन केल्याने त्यांना उत्कृष्ट मेन्टॉर शिक्षक म्हणून प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

धोंडेवाडी शाळेत कोडींगचा उपक्रम सुरू असून इयत्ता तिसरी ते सातवी पर्यंतचे विद्यार्थी ब्लॉक बेस कोडींग करतात. स्वतः चे नाव ॲनिमेशन करून प्रकल्प तयार करतात. जयवंत जाधव व सविता तनपुरे या दोन्ही शिक्षकांचे भोर तालुका गटशिक्षणाधिकारी राजकुमार बामणे, विस्ताराधिकारी सुषमा पाटील, केंद्रप्रमुख अंजना वाडकर ग्रामपंचायत सदस्य सोपान धनावडे, विठ्ठल धोंडे, सीमा शिरगावकर, ध्रुव प्रतिष्ठान अध्यक्ष राजीव केळकर, माध्यमिक विद्यालय आंबवडे मुख्याध्यापक सुनील थोपटे, रघुनाथ पारठे, अंकुश भिलारे, दत्तात्रय सुतार, अनिता पवार यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.